# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर -४१६ ००४

E-mail: jdhekop@gmail.com

फोन क्र. : (०२३१) २५३५४००, २५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्र. : विसस/उशि/कोवि/२०२२/ 6321 दिनांक :- ११/११/२०२२

प्रति,

१. प्र. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,

२. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित,
कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालये,
कोल्हापूर / सांगली / सातारा.

विषय :- **सन २०२२-२३ करिता उच्च शिक्षण विभागांतर्गत सहा प्रशिक्षण केंद्रे तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील प्रशिक्षण केंद्रासाठी दिनांक ०४.१२.२०२२ रोजी होणाऱ्या एकत्रित सामायिक प्रवेश परीक्षेची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणेबाबत.**

संदर्भ :- प्र. संचालक, भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर यांचे पत्र दि.११.११.२०२२,

उपरोक्त विषयांकित संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते कि, राज्यातील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र,कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांच्यासह संचालित, डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधनी (यशदा), सावित्रीबाई फुले अकॅडमी व पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC), पुणे इत्यादी संस्था मार्फत केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा परीक्षा २०२३ करिता पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता दिनांक ०४.१२.२०२२ रोजी सामाईक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. सुलभ संदर्भासाठी जाहिरातीची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

सदर जाहिरात आपल्या विद्यापीठ / महाविद्यालच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी तसेच, दर्शनी भागामध्ये लावून सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

सोबत :- जाहिरात

प्रत :- प्र. संचालक, भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर यांना माहितीस्तव,

# Notification for the Common Entrance Test (CET) for Seeking Admission to SIAC, PITCs, YASHADA and PCMC for Free Coaching for UPSC Civil Services Examination, 2023

Online Applications are invited from the eligible and interested candidates for seeking admission to the **State Institute for Administrative Careers (SIAC), Mumbai and Pre-IAS Training Centres (PITCs), Nashik, Kolhapur, Aurangabad, Amravati and Nagpur under the Higher and Technical Education Department, Dr. Ambedkar Competitive Examination Guidance Centre, YASHADA and Savitribai Phule Academy, Pimpri Chinchwad Municipal Corporation (PCMC), Pune,** for availing free full-time coaching for UPSC Civil Services Examination, 2023.

**Timetable of Admission Process:**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Commencement of Online Application | Friday<br>Dt. 04/11/2022 | From 10.00 a.m. onwards |
| 2. | Last date of submitting application | Friday<br>Dt. 25/11/2022 | Till 12.00 midnight |
| 3. | Last date for payment of fees | Friday<br>Dt. 25/11/2022 | Till 12.00 midnight |
| 4. | Common Entrance Test | Sunday<br>Dt. 04/12/2022 | From 11.00 a.m. to 1.00 p.m. |

**Note:-**

(1) Admissions will be granted on the basis of the combined performance in written examination and interview. The schedule of the interview will be declared after the written examination.

(2) On declaration of the results of the Common Entrance Test, the students will have to log-in to the admission portal and select centre of their own choice for admission.

(3) Students will not be provided information regarding CET on individual basis. All information pertaining to the CET will be displayed on the official website of SIAC.

For detailed notification, syllabus of the examination, eligibility conditions and other information pertaining to the online application for CET refer to www.siac.org.in.

Date: 03.11.2022
Place: Mumbai

sd/-
Director, SIAC, Mumbai
Nodal Officer, Common Entrance Test

# SIAC, PITCs, YASHADA आणि PCMC द्वारे देण्यात येणाऱ्या निशुल्क नागरीसेवा परीक्षा प्रशिक्षण २०२३ करिता प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षेची अधिसूचना

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत **राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (YASHADA) संचालित डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र (एसीईसी), पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) संचालित सावित्रीबाई फुले अकॅडेमी, पुणे** मार्फत केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२३ साठी पूर्ण वेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले असून इच्छुक पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहे.

**प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक:-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज सुरुवात | शुक्रवार<br>दि. ०४.११.२०२२ | सकाळी १०.०० पासून |
| २ | अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | शुक्रवार<br>दि. २५.११.२०२२ | रात्री १२.०० पर्यंत |
| ३ | परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | शुक्रवार<br>दि. २५.११.२०२२ | रात्री १२.०० पर्यंत |
| ४ | प्रवेश परीक्षा | रविवार<br>दि. ०४.१२.२०२२ | सकाळी ११.०० ते दुपारी १.०० |

**टीप:** -

(१) विद्यार्थ्यांचे प्रवेश लेखी परीक्षा आणि मुलाखतीतील कामगिरीच्या आधारे ठरवले जाणार असल्याने मुलाखतीचे वेळापत्रक परीक्षेनंतर जाहीर केले जाईल.

(२) सामायिक प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर लॉग-इन करून त्यांच्या पसंतीचे प्रशिक्षण केंद्र प्रवेशासाठी निवडावे.

(३) प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना कोणतीही माहिती वैयक्तिक रित्या उपलब्ध करून दिली जाणार नाही. प्रवेश प्रक्रियेबद्दलची सर्व माहिती SIAC च्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल .

**सविस्तर जाहिरात, परीक्षेचा अभ्यासक्रम, पात्रता, ऑनलाईन अर्ज भरण्याविषयी सूचना व इतर माहिती www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

दिनांक: ३.११.२०२२
स्थळ: मुंबई

sd/-
संचालक, SIAC, मुंबई
समन्वयक, सामायिक प्रवेश परीक्षा